जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१०          दिनांक - ०६/०१/२०२५**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# दिवसा घरफोडी करणा-याला टोळीला बेडया ठोकुन चोरीस गेले मुद्देमाल केला हस्तगत

चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६६९/२०२४ बी.एन.एस. कलम. ३०५, ३३१ (३),३१७(२),३(५) मधील फिर्यादी यांच्या घराचा कोणीतरी अज्ञात इसमाने कोडीकोयंडा तोडुन घरामध्ये प्रवेश करुन ५,४७,०००/- रु. किं.चे सोने चोरी गेले बाबत तक्रार दिली होती.

दाखल गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंदननगर पोलीस स्टेशन पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली, **पोलीस अंमलदार कदम व लहाने**,यांनी सदर आरोपीचा शोध घेण्याकरीता आरोपी येणे जाण्याचे मार्गावरील ६० ते ७० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन तसेच त्याच्या खात्रीशीर बातमीदारा मार्फत सदर इसमाचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले असता, सदर मुले हे विधी संघर्षित बालक असल्याचे पालकाकडुन माहिती मिळाल्याने सदर दोन बालकाकडे त्यांचे पालकासमक्ष चोरीस गेलेले सोन्याचे दागिने व इतर माल बाबत विचारपुस करता, त्यांने सदर चोरी केलेले सोन्याचे दागिने व इतर माल आरोपी नामे **१)दर्शन दत्तात्रय कोळी,वय २२,रा. झुरुंगे वस्ती, लोणीकंद पुणे.मुळ पत्ता शिवगंगा नगर,मजरेवाडी सोलापुर,२) अनिल करेप्पा कोळी,वय २२, रा. राहटणी फाटा, धनगरबाबा मंदीर, पिंपरी मुळ पत्ता स्वामी विवेकानंदनगर,मजरेवाडी, सोलापुर** यांना विकला असल्याचे सांगितल. सदर आरोपींना चंदननगर पोलीस स्टेशन येथे आणुन त्यांच्या कडे तपास करता ते उडवा उडवीचे उत्तरे देवु लागल्याने त्यांना अधिक विश्वासात घेवुन तपास केला असता,दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने हे सोनार नामे सत्यवानकाका यमगर वय-२३ वर्ष रा.बाळेवाडी ता-आटपाडी जिल्हा-सांगली याला विकले असल्याचे सांगितले.सदर सोनाराचा शोध घेवुन त्याच्याकडे सदर सोन्याबाबत तपास केला असता, त्यांने सदर सोन्याची लगड केले असल्याबाबत सांगुन त्याच्या ताब्यातुन ०३,५०,०००/- रु.किं.ची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक,दत्तात्रय लिगाडे, चंदननगर पोलीस स्टेशन हे करीत आहे.

तसेच चंदननगर पोलीस ठाणे गु.र.नं. ६७०/२०२४, बी.एन.एस.क.३०५,३३१(३), अन्वये दाखल गुन्हयाची सुध्दा उकल करण्यात यश आले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त परि.४ पुणे शहर श्री.हिम्मत जाधव, मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग,पुणे श्रीमती प्रांजली सोनवणे, चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अनिल माने,यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक दत्तात्रय लिगाडे पोलीस अंमलदार सचिन रणदिवे, विश्वनाथ गोणे, शिवाजी धांडे, विकास कदम, नामदेव गडदरे,ज्ञानेश्वर लहाने, शेखर शिंदे, अनुप सांगळे यांनी केली.